पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड-३३
क्र. एएमसी/बप्र२/कावि/६५/२०१०
दि. ३/२ /२०१०

प्रति,

मा.श्री./श्रीमती ----------------------
सदस्य/सदस्या, ब प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
चिंचवड-३३

**विषय :- ब प्रभाग समितीची मासिक सभा दि. १०/२/२०१० रोजी आयोजित केलेबाबत**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. १०/२/२०१० रोजी दु. १२.१५ वा ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. तरी प्रस्तुत सभेस आपण उपस्थित रहावे, हि विनंती

कळावे,

**आपला विश्वासू**

**प्रशासन अधिकारी,[सभाशाखा]**
**ब प्रभाग समिती,**
**चिंचवड -३३**

**प्रतः**

**सर्व संबंधित शाखा प्रमुख**
**----------------------------**

F:\b ward meet ०९-१०\agenda feb.२०१०.doc

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी**
**ब प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्र. ११**

**दि. १०/२/२०१०** **वेळ : दु. १२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. १०/२/२०१० रोजी दु. १२.१५ वा ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सभेत खालील प्रमाणे कामकाज होईल.

मागील सभेचा सभावृत्तांत [ दि.२०/१/२०१० ] वाचून कायम करणे . तसेच ऐनवेळचे विषय दाखल करुन त्यावर चर्चा करणे.

**विषय क्र. १** **विभाग :- नगररचना व विकास**

विषय :- मौजे रावेत ता. हवेली येथील मंजुर विकास योजनेतील रावेत गावठाण ते धर्मराज मंगल कार्यालय ते किवळे हद्दीपर्यत १८.०० मी. रस्ता रुंदीखालील जागेचे भूसंपादन करणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजुर विकास योजनेतील मौजे रावेत ता. हवेली येथील विकास योजनेतील रावेत गावठाण ते धर्मराज मंगल कार्यालय ते किवळे हद्दीपर्यंत १८.०० मी. रस्ता रुंदी या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ [२ ] व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतुदीनुसार भूसंपादन करावे लागेल. या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास [ संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम ] महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा. ब प्रभाग समिती मार्फत मा. महापालिका सभेपुढे मान्यतेकामी शिफारस करणे.

**प्रशासन अधिकारी,[सभाशाखा]**
**ब प्रभाग समिती,**
**चिंचवड -३३**

**प्रतः**

**सर्व संबंधित शाखा प्रमुख**

**-----------------------**